| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


## प्रेस नोट

दिनांक : २२/१०/२०२४

### नाशिक ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई - देशी बनावटीचे पिस्टल, ०२ जिवंत काडतुसे व ०१ तलवार जप्त लाखो रुपये किंमतीचा अवैध मद्यसाठा नाश

---

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर नाशिक परिक्षेत्राचे मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली दि.१५/१०/२०२४ रोजी पासून नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने आज दि. २२/१०/२०२४ रोजी पहाटेचे सुमाराम स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मालेगाव शहरातील आयशानगर पोलीस ठाणे हद्दीत जाफरनगर परिसरात इसम नामे **इरशाद आलम अब्दुलाई अन्सारी,** वय २४, रा. जाफरनगर, मालेगाव यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन **०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे** हस्तगत केली आहे. सदर इसम हा विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक अग्निशस्त्र कब्जात बाळगतांना मिळुन आला असून त्याचेविरूध्द आयशानगर पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच **निफाड पोलीस ठाणे हद्दीत** विनापरवाना बेकायदेशीररित्या धारदार तलवार कब्जात बाळगल्या प्रकरणी एका इसमाविरूध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०२४ रोजी नाशिक ग्रामीण व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीत देशी विदेशी मद्याची विक्री व वाहतुक तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे एकुण ३६ इसमांविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करून ३६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्यात देशी विदेशी मद्य व हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन व साहित्य सामुग्री असा एकुण ५,१५,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल नाश / जप्त करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुक सन २०२४ च्या पार्श्वभुमीवर नाशिक जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, समाजकंटकांवर व गुन्हेगारांवर वचक राहुन निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात याकरीता जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे निहाय वरील प्रमाणे सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.